# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९७ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१५६४ : प्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ गॅलिलिओ यांचा जन्मदिन.

१८६९ : प्रख्यात शायर मिर्झा गालिब यांचे निधन.

१८७१ : सुप्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ आल्फ्रेड व्हाइटहेड यांचा जन्मदिन.

१९८० : कुष्ठरोग्यांचे पहिले भारतीय सेवक पद्मश्री मनोहर दिवाण यांचे निधन.

सेन्सेक्स ८२,६२६.७६ -१,०४८.१६ (१.२५%)

डॉलर ₹ ९०.५६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १६ |
| दिल्ली | २६ | १३ |
| मुंबई | ३६ | २२ |
| नागपूर | ३३ | १८ |
| पुणे | ३३ | १२ |

**सुविचार**

स्वप्न पाहणार्यांच्या लोकांसाठीच ते साकार होतात; स्वप्न पाहणे सोडू नका.

सूर्योदय - सूर्यास्त

स.-६:५८ संध्या-६:२६

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,५७,१९५/- २,७५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

# राज्यात पाच वर्षांत कर्करोगाचे रुग्ण ११ टक्क्यांनी वाढले

## आता केवळ उपचार नव्हे तर प्रतिबंधात्मक उपायांवरही भर देण्याची गरज : मुख्यमंत्री फडणवीस

वृत्तसंस्था । नागपूर

**महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत कर्करोगाच्या रुग्णसंख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे, अशी कबुली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

नागपुरातील नॅशनल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन कार्यक्रमात ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, ऑन्कोलॉजी बियॉन्ड बॉर्डर्स ही संकल्पना स्वत:च सर्व काही सांगते. कोणताही आजार किंवा आरोग्य समस्या कोणत्याही सीमा, दर्जा किंवा भौगोलिक मर्यादा ओळखत नाही. म्हणूनच आजच्या परस्पर जोडलेल्या जगात आपण एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करणे आवश्यक आहे. गेल्या दशकात कर्करोगाचे प्रमाण वेगाने वाढत आहे. संसर्गजन्य रोगांविरुद्ध लढ्यात भारताने यश मिळवले असले तरी कर्करोग हे आरोग्य व्यवस्थेसमोर मोठे आव्हान ठरत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार पुढील १५ ते २० वर्षांत कर्करोगाचे प्रमाण ७५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत रुग्णसंख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे त्यांनी सांगितले. आता केवळ उपचार नव्हे तर प्रतिबंधात्मक उपायांवरही भर देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संशयित रुग्णांचे तपासणी साधनसामग्री, कार्यपद्धती आणि लवकर निदानाची क्षमता विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



- एनसीआय सारख्या संस्थांमुळे केवळ मध्य भारतातीलच नव्हे तर परदेशातील रुग्णांनाही सेवा मिळत असून, अस्थी मज्जा प्रत्यारोपण सारख्या अत्याधुनिक प्रक्रिया येथे होत आहेत, असे त्यांनी सांगितले. राज्यात अशा आणखी संस्थांची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र शासनाने महा कॅन्सर केअर फाउंडेशन या कलम ८ कंपनीच्या माध्यमातून हब अँड स्पोक मॉडेलवर आधारित कॅन्सर ग्रिड उभारण्याचा उपक्रम सुरू केला आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत उपचार पोहोचवणे हा त्यामागील उद्देश आहे.

**कर्करोग उपचारांतील सर्वात मोठे आव्हान म्हणजे खर्च. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांवर याचा मोठा परिणाम होतो. हा केवळ रुग्णाचा नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचा संघर्ष असतो. त्यामुळे उपचार परवडणारे करणे अत्यावश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने आयातीत कर्करोग औषधे व उपकरणांवरील कर कमी करून खर्च कमी करण्याचा प्रयत्न केल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.**

## जिल्ह्यातील ७५७ ग्रा.पं.चा कारभार त्रिशंकू अवस्थेत!

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

जिल्ह्यातील १३२७ ग्रामपंचायतींपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे ७५७ ग्रामपंचायतींचा कारभार सध्या त्रिशंकू अवस्थेत गेल्याने ठप्प झाला आहे. सध्या या ७५७ ग्रामपंचायतींवर लोकनियुक्त मंडळ (सरपंच व सदस्य) नाही आणि प्रशासकही नाहीत. त्यामुळे गावगाड्यांचा कारभार चालणार कसा, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

अशी अभूतपूर्व परिस्थिती प्रथमच निर्माण झाल्याचा अनुभव जिल्हा परिषदेतील अधिकारी व्यक्त करत आहेत. राज्यातील काही जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुका आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने न्यायालयीन खटल्यातून प्रलंबित आहेत. त्याच्याच परिणामातून ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही लांबणीवर टाकल्या गेल्या आहेत.

## थोडक्यात

### शेतकऱ्यांना लवकरच कर्जमाफीजी घोषणा

**मुंबई ।** शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी आज माध्यमांशी बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. शेतकरी कर्जमाफीबाबत अगोदरच निर्णय झाला आहे, असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे. उदय सामंत म्हणाले, राज्यातील सर्व बँकांकडून शेतकऱ्यांच्या थकित कर्जाची माहिती मागवण्यात आलेली आहे.

### शिंदेंच्या शिलेदाराचा तडकाफडकी राजीनामा

**मुंबई ।** शिंदे गटाचे सिंधुदुर्ग येथील जिल्हा समन्वयक सचिन वालावलकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने खळबळ उडाली. चंद्रपूरच्या महापौरपदी संगीता खांडेकर विराजमान झाल्यानंतर भाजपातील दोन गटातला वाद विकोपाला गेला आहे. पक्षात बहिष्कार नाट्य रंगले असून पक्षाच्या समर्थनार्थ भूमिका न घेणाऱ्या कल्याणमधील तीन नगरसेवकांवर ठाकरे गटाकडून निलंबनाची कारवाई केली जाणार आहे.

# अनोंदणीकृत विमान चालक प्रशिक्षण केंद्रांची चौकशी : मंत्री मोहोळ

वृत्तसंस्था । सांगली

**बारामतीतील विमान दुर्घटनेनंतर देशभरात अनोंदणीकृत विमान चालक प्रशिक्षण केंद्रे किती आहेत? याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती केंद्रिय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शनिवारी सांगलीत दिली.**

अंबाबाई तालीम संस्थेच्या एसबीजीआयच्या सौहार्द स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आणि ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनच्या पुरस्कार वितरण केंद्रिय राज्यमंत्री मोहोळ यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. प्रारंभी राज्य मराठी पत्रकार संघटनेचे संघटक व संस्थेचे अध्यक्ष संजय भोकरे यांनी प्रास्ताविक तर सिध्दार्थ भोकरे यांनी स्वागत केले. जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी पुरस्कार देण्यामागील उद्देश कथन केला. या प्रसंगी महापौर धीरज सूर्यवंशी, मंदार फणसे, गुरूमित सिंग उर्फ शेरा, सुहास खामकर, डॉ. विनोद परमशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी माध्यमांशी बोलताना मंत्री मोहोळ म्हणाले, बारामतीत विमान अपघाताची घटना दुर्दैवी आहे.या अपघाताच्या चौकशीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. यामुळे दुर्घटनाग्रस्त विमानामध्ये किती जण होते हे चौकशी अहवाल आल्यानंतरच स्पष्ट होईल. बारामती विमानतळ हे पायलट प्रशिक्षण केंद्र होते. याची नोंद केंद्रिय विमानतळ वाहतूक मंत्रालयाकडे नोंदणी झालेली नव्हती.

मात्र, या पूर्वीही बऱ्याचवेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी याठिकाणी विमानाने प्रवास केला आहे. देशात अशी किती अनोंदणीकृत विमान (पान २ वर)

## भारत-पाकिस्तान टी-२० वर्ल्डकप सामना रद्द होणार?

वृत्तसंस्था । मुंबई

टी-२० विश्वचषक २०२६ मधील बहुप्रतिक्षित सामना हा भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये खेळवला जाणार आहे. हा सामना १५ फेब्रुवारीला आर प्रेमदासा स्टेडियम कोलंबोमध्ये होईल. गेल्या काही काळातील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण संबंधांनंतर आणि टी-२० वर्ल्डकपपूर्वीच्या वादामुळे या सामन्यावर सर्वांचं लक्ष असणार आहे. पण श्रीलंकेतून या सामन्यादरम्यान हवामानाच्या आलेल्या अहवालाने सामना रद्द होण्याची शक्यता आहे.

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धा सुरू होण्यापूर्वी पाकिस्तानने भारताविरूद्ध सामना खेळणार नसल्याचं जाहीर केलं होतं. पाकिस्तान सरकारने संघाने भारताविरूद्ध सामना खेळण्यासाठी मैदानात उतरू नये, असे निर्देश दिले होते. पण आयसीसीच्या मध्यस्थीनंतर पाकिस्तान सरकारने संघाला भारताविरूद्ध सामना खेळण्याचे निर्देश दिले आहेत.

# भरधाव डंपरच्या धडकेत मजूर जागीच ठार, जमावाकडून तोडफोड

प्रतिनिधी । जळगाव



**शहरातील कालिंका माता मंदिर परिसरात शुक्रवारी रात्री भरधाव वेगात येणाऱ्या डंपरने रस्त्याने पायी चालत असलेल्या मजुराला चिरडल्याची घटना घडली. अपघातानंतर परिसरात संतापाची लाट उसळली. नागरिकांनी अपघातास कारणीभूत ठरलेल्या डंपरची तोडफोड करत प्रशासनाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी केली.**

प्रभाकर रघुनाथ पाटील (५६, रा. तैली चौक, जुने जळगाव) असे मृत व्यक्तीचे नाव असून, ते हातमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर पाटील हे शुक्रवारी कामावरून परत येत होते. या दरम्यान, भाजीपाला खरेदी केल्यानंतर ते पायी घरी जात होते. मात्र, कालिंका माता मंदिराजवळील चौकातून रस्ता ओलांडत असताना नशिराबादकडून येणाऱ्या विनाक्रमांकाच्या डंपरने त्यांना जोरदार धडक दिली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, डंपरचा वेग खूपच जास्त होता. धडकेनंतर पाटील रस्त्यावर कोसळले. डंपरचे पुढील चाक थेट त्यांच्या चेहऱ्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की तो पाहून परिसरातील नागरिक हादरून गेले.

अपघातानंतर काही क्षणात नागरिकांनी डंपर थांबवण्याचा प्रयत्न केला; मात्र, (पान २ वर)

# भारतातील पहिल्या आपत्कालीन लँडिंग सुविधेचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

## • आसामच्या महामार्गावर उतरलं लढाऊ विमान; आपत्कालीन लँडिंग सुविधेमुळे चीनवर नजर?

वृत्तसंस्था । दिसपूर

**आसाममधील मोरन येथे ईशान्य भारतातील पहिल्या आपत्कालीन लँडिंग सुविधेचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांनी केले. त्यांच्या उपस्थितीत येथील महामार्गावरील धावपट्टीवर लढाऊ विमान उतरविण्यात आले. आसामच्या धोरणात्मक आणि पायाभूत सुविधा विकासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.**

आज झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत भारतीय हवाई दलाचे सुखोई -३० आणि राफेल लढाऊ विमानाचे लँडिंग आणि उड्डाण करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विमानांना उतरता यावे आणि उड्डाण घेता यावे, यासाठी हा राष्ट्रीय महामार्ग खास पद्धतीने विकसित करण्यात आला आहे.



आसाममध्ये काही दिवसांनी निवडणुका होणार आहेत. त्यापूर्वीच पंतप्रधान मोदींनी राज्यात ४.२ किमी लांबीच्या महामार्गाचे उद्घाटन केले.

चीनला लागून असलेल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून ३०० किमीहून कमी अंतरावर असलेल्या या महामार्गाचे धावपट्टीत रूपांतरित केले आहे. राष्ट्रीय महामार्ग १२७ च्या दिब्रुगड-मोरान महामार्गावर ही धावपट्टी विकसित करण्यात आली आहे. अप्पर आसाममध्ये निर्माण केलेल्या या सुविधेमुळे ईशान्य भारतात लष्कराच्या सुविधांमध्ये एक धोरणात्मक भर पडल्याचे सांगितले जात आहे. यामुळे या प्रदेशात हवाई दलाच्या कामकाजाला अधिक लवचिकता मिळेल. ४.२ किमींच्या (पान २ वर)

# रेरा कायदा रद्द करण्याऐवजी तो अधिक कठोर करा

## मुंबई ग्राहक पंचायतीने केली मागणी

वृत्तसंस्था । मुंबई

**देशाचे सरन्यायाधीशच जर संसदेने संमत केलेला रेरा कायदा सरसकट रद्द करा, असा उद्वेग जाहीरपणे सर्वोच्च न्यायालयात व्यक्त करत असतील तर ते निश्चितच दखलपात्र आहे. महाराष्ट्रासह बहुतेक राज्यात रेरा अध्यक्ष हे निवृत्त सनदी अधिकारीच आहेत हे सत्य आहे. परंतु रेरा कायद्यानुसार, रेरा अध्यक्षांची नेमणूक करणाऱ्या निवड समितीचे अध्यक्ष हे प्रत्येक राज्यातील उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा त्यांनी नेमलेले न्यायाधीशच असतात, हे सरन्यायाधीश विसरले असावेत.**

यापुढे तरी निवृत्त सनदी अधिकारी रेरा अध्यक्ष म्हणून नेमण्याऐवजी अनुभवी वास्तुशास्त्रज्ञ वा बांधकाम क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ या पदावर नेमले जातील याची खबरदारी घेण्याच्या सूचना सरन्यायाधीशांनी द्याव्यात, अशी प्रतिक्रिया मुंबई ग्राहक पंचायतीने व्यक्त केली आहे. रेरा कायदा रद्द करण्याऐवजी तो अधिक कठोर करता येऊ (पान २ वर)




## • कामाच्या ताणाला दिला ब्रेक

# धुळे जिल्हा परिषदेचे अधिकारी आदिवासी नृत्याच्या तालावर थिरकले

प्रतिनिधी । धुळे

**दिवस-रात्र प्रशासकीय कामाच्या व्यापात गुंतलेले अधिकारी आणि कर्मचारी जेव्हा गाण्याच्या तालावर ठेका धरतात, तेव्हा कामाचा सारा ताणतणाव क्षणात दूर होतो.**



असाच आनंददायी अनुभव सध्या धुळयात पाहायला मिळत असून, धुळे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांना उत्साहात सुरुवात झाली आहे. जिल्हा क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या या तीन दिवसीय महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. धुळे जिल्हा परिषदेच्या वतीने (पान २ वर)

## संपादकीय

### पुन्हा कासव जिंकणार का?

ससा आणि कासवाची शर्यत या गोष्टीमध्ये कासव जिंकला. मात्र आता वाढते तापमान, उद्ध्वस्त अधिवास यामुळे कासवांचा संघर्ष सुरू आहे. हवामान बदलविरुद्ध कासव यात कोण जिंकणार? हवामान बदलाचा प्रभाव संपूर्ण पर्यावरणावर जाणवत आहे आणि त्याचे दुष्परिणाम समुद्री जैवविविधतेवरही स्पष्टपणे दिसून येतात. समुद्री कासव ही प्राचीन सरीसृप प्रजाती असून ती सुमारे १० कोटी वर्षांपासून अस्तित्त्वात आहे. मात्र, सध्या वाढते तापमान, समुद्रपातळीतील वाढ आणि मानवी हस्तक्षेप यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. विशेषतः तापमानवाढीमुळे कासवांच्या पिल्लांचे लिंग गुणोत्तर बदलत आहे, तर वादळे आणि समुद्रपातळीतील वाढ यामुळे त्यांच्या निवासस्थानांवर गंभीर परिणाम होत आहे. समुद्री कासव समुद्राच्या परिसंस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ते समुद्री गवताच्या कुरणांचे आणि प्रवाळ भित्तींचे आरोग्य राखण्यात मदत करतात, पोषक तत्त्वांचे सायकलिंग सुलभ करतात आणि इतर सागरी जीवनासाठी निवासस्थान प्रदान करतात. कासवांच्या संख्येत घट झाल्याने, त्यांच्या या महत्त्वपूर्ण भूमिकांची कार्यक्षमता कमी होते, ज्यामुळे महासागरांचे एकूण आरोग्य प्रभावित होते. कासवांच्या लोकसंख्येचे पुनरुज्जीवन सुनिश्चित करणे हे सागरी परिसंस्थेचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहे. सर्व समुद्री कासवांना वन्यजीव संरक्षण कायद्याच्या अनुसूची अंतर्गत संरक्षण दिले जाते, ज्यामुळे त्यांना भारतात सर्वात उच्चस्तराचे संरक्षण प्राप्त होते. जगभरात समुद्री कासवांच्या एकूण सात प्रजाती आढळतात. भारताच्या समुद्रकिनाऱ्यावर प्रामुख्याने पाच समुद्री कासवांच्या प्रजाती आढळतात. ऑलिव्ह रिडले कासव भारताच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात आढळते. ग्रीन टर्टल–गुजरात, लक्षद्वीप आणि अंदमान–निकोबार बेटांवर आढळते. हॉकसबिल कासव अंदमान आणि निकोबार बेटांवर आढळते. लेदरबॅक कासव अंदमान आणि निकोबार बेटांवर आढळते. लॉगरहेड कासव भारताच्या किनाऱ्यावर दुर्मिळ आहे. समुद्री कासवांच्या प्रजनन प्रक्रियेत वाळूचे तापमान महत्त्वाची भूमिका बजावते. वैज्ञानिक संशोधनानुसार, जर वाळूचे तापमान २९० अंशसेल्सिअसपेक्षा कमी असेल, तर जास्त संख्येने नर कासव जन्माला येतात आणि तापमान ३०० अंशसेल्सिअसपेक्षा जास्त असल्यास मादांची संख्या वाढते. परिणामी भविष्यातील पिढ्यांसाठी संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. फ्लोरिडामधील एका संशोधनानुसार, गेल्या दोन दशकांत समुद्री कासवांच्या जन्मलेल्या पिल्लांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक मादांचा समावेश होता. याचाच अर्थ, नर कासवांची संख्या झपाट्याने कमी होत असून त्यामुळे भविष्यातील प्रजनन क्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. हवामान बदलामुळे समुद्रपातळी वाढत असून त्यामुळे समुद्री कासवांच्या नैसर्गिक घरट्यांचा नाश होत आहे. अनेक किनारे कमी होत चालले असून, वाढत्या भरतीमुळे अंडी वाहून जात आहेत. या समस्या विशेषतः भारतातील किनारपट्टी भागात अधिक जाणवत आहेत. ओडिशातील गहिरमाथा समुद्रकिनारा, जो जगातील सर्वात मोठ्या ऑलिव्ह रिडले कासवांच्या समूहासाठी प्रसिद्ध आहे, तेथे गेल्या काही वर्षांत समुद्राच्या भरतीमुळे मोठ्या प्रमाणात घरटी वाहून गेली आहेत. परिणामी, या भागातील प्रजनन यशस्वीतेचा दर घटत आहे. गुजरात आणि महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले आणि ग्रीन कासवांची संख्या कमी होत असल्याचे आढळले आहे. काही संशोधक वाळूचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी घरटे संरक्षित करण्याचे तंत्रज्ञान वापरत आहेत. भविष्यातील समुद्री परिसंस्था संतुलित ठेवण्यासाठी समुद्री कासवांचे संवर्धन अत्यावश्यक आहे.

# वरणगाव रेल्वेस्टेशनवर सुविधांचा अभाव

## लोकप्रतिनिधींच्या तक्रारीकडे डीआरएम यांनी फिरविली पाठ ; शिवसेनेकडून निषेध

**प्रतिनिधी । वरणगाव**

भुसावळ तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्येचे गाव असलेल्या वरणगाव शहरातील रेल्वे स्टेशनवर सुविधांचा अभाव आहे. यासह सिद्धेश्वर नगरकडे जाणाऱ्या पुलाखाली पाणी साचत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भात वरणगाव नगरपरिषदेचे शिवसेना (शिंदे गट) नगरसेवकांनी शनिवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी भुसावळ रेल्वेचे डीआरएम पुनित अग्रवाल यांना निवेदन दिले. मात्र, लोकप्रतिनिधींच्या या मागण्यांकडे डीआरएम यांनी सप्शेल पाठ फिरविली. डीआरएम यांच्या हा मुजोरपणा असल्याचे म्हणत शिवसेना नगरसेवकांनी निषेध नोंदविला आहे.





दीपनगर औष्णिक विद्युत केंद्रात कोळसा वाहतुकीसाठी नवीन रेल्वेलाईन टाकण्यात येत आहे. त्यासंदर्भातील पाहणीसाठी मध्यरेल्वे भुसावळ विभागाचे डीआरएम पुनित अग्रवाल हे वरणगाव रेल्वे स्टेशनवर आले होते. दरम्यान, त्यांनी वरणगाव रेल्वे स्टेशन व परिसरातील ३ रेल्वे पुलांची पाहणी केली. यावेळी शिवसेनेचे नगरसेवक राजेंद्र चौधरी, विनोद झोपे, अशफाक शाह सगीर शाह, मिलिंद मेढे, यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी डीआरएम यांना निवेदन देवून वरणगाव ते सिद्धेश्वरनगरापर्यंत असलेल्या पुलाची पाहणी करुन पुलाखाली साचणाऱ्या पाण्याची समस्या सोडवावी. तसेच वरणगाव रेल्वे स्टेशनवर प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, एक्स्प्रेस गाड्यांना वरणगाव स्टेशनवर थांबा मिळावा, आरक्षण खिडकी सुरु करण्यात यावी, प्रवाशांसाठी प्रवाशी शेड उभारावे, अशा विविध मागण्या केल्या. मात्र, या समस्या आणि लोकप्रतिनिधी असलेल्या नगरसेवकांच्या मागणीकडे डीआरएम यांनी दुर्लक्ष करत काढता पाय घेतला, असा आरोप शिवसेना नगरसेवकांनी केला. तसेच डीआरएम यांची ही भूमिका आडमुठेपणाची असल्याचे म्हणत नगरसेवकांनी डीआरएम यांचा निषेध केला आहे.

### ➤ वरिष्ठांकडे तक्रार करणार

कोरोना काळात वरणगाव स्टेशनवर ज्या रेल्वेगाड्या थांबत होत्या, त्यांना पुन्हा थांबा द्यावा. तसेच वरणगाव ते सिद्धेश्वर नगरापर्यंत असलेल्या पुलाखाली पाणी साचत असल्याने ही समस्या दुर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी डीआरएम यांना विनंती केली. मात्र, डीआरएम यांनी लोकप्रतिनिधींच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत असतात. मात्र, भुसावळ डीआरएम यांना सामान्य नागरिकांशी काही घेणेदेणे नाही, असे त्यांच्या वागण्यावरुन दिसतंय. त्यामुळे अशा मुजोर अधिकाऱ्यास समज द्यावी, यासाठी वरिष्ठ पातळीपर्यंत तक्रार करणार असल्याचे नगरसेवक राजेंद्र चौधरी, मिलिंद मेढे यांनी शौर्य मराठीशी बोलताना सांगितले.

# संत मुक्ताई–चांगदेव गुरु–शिष्य भेटीचा रंगला सोहळा

**प्रतिनिधी । मुक्ताईनगर**

**जीवाला शाश्वत विश्रांती आणि मनाला अध्यात्मिक शांती मिळवून देणारे ठिकाण म्हणजे संतांचे गाव. या श्रद्धेपोटीच सध्या आदिशक्ती संत मुक्ताईंच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या मुक्ताईनगरीत भक्तीचा महापूर लोटला आहे. निमित्त आहे, आदिशक्ती संत मुक्ताई आणि योगी चांगदेव महाराज गुरु–शिष्य भेटीच्या यात्रोत्सवाचे.**



माघ महिन्यातील या परंपरेने अवघे मुक्ताईनगर टाळ–मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या चैतन्यात न्हाऊन निघाले आहे. या यात्रेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे योगी चांगदेव महाराज आणि आदिशक्ती मुक्ताबाई यांच्यातील गुरु–शिष्य नाते. माघ वद्य महाशिवरात्रीला चांगदेव महाराजांनी पुणतांब्याला समाधी घेतली होती. याच समाधी सोहळ्याचे स्मरण म्हणून ही वारी साजरी केली जाते. महाशिवरात्रीला मुक्ताईंच्या पादुका पालखी सोहळ्यासह चांगदेव भेटीला निघतात, तेव्हा अवघ्या विश्वातील गुरु–शिष्य भेटीचा एक अनुपमेय आणि भावनिक क्षण वारकरी अनुभवतात.

विजया एकादशीच्या मंगल पर्वावर, केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या सुकन्या कुमारी क्रीषीका खडसे यांच्या हस्ते जुन्या मुक्ताई मंदिरात विधीवत पूजा आणि अभिषेक करण्यात आला. राजकारणापलीकडे जाऊन आपल्या संस्कृतीची ही पाळेमुळे नव्या पिढीच्या हातून जोपासली जात असल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

केवळ भक्तीच नाही, तर मन सेवा हीच नारायण सेवा या उक्तीचा प्रत्यय येथे येतो. आमदार चंद्रकांत पाटील यांनी केवळ वारकरी आणि भाविकांना फराळ वाटपच केले नाही, तर स्वतः गळ्यात टाळ घेऊन ते भजनात तल्लीन झाले. मुक्ताईनगर सिव्हिल सोसायटीच्या सेवेकरी फॉर्म्युला यामुळे यंदा दर्शनबारी, चहा–पाणी आणि चप्पल स्टँड यांसारख्या व्यवस्था अतिशय सुटसुटीत झाल्या आहेत. लाखो भाविकांची गर्दी असूनही, शिस्तीमुळे हा यात्रोत्सव सुरक्षित आणि सुखकर झाला आहे. काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक आशिष आडसूळ हे लक्ष ठेवून आहेत.

# डॉक्टरावरील हल्ल्याचा आयएमएकडून निषेध

**प्रतिनिधी । धुळे**

इंडियन मेडिकल असोसिएशन सदस्य डॉ.सुशिल नवसारे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा इंडियन मेडिकल असोसिएशनच्या धुळे शाखेच्यावतीने तीव्र निषेध करण्यात आला. आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधिक्षकांची भेट घेवून कठोर कारवाईच्या मागणीचे निवेदन सादर केले. तसेच आयएमए हॉलबाहेर निदर्शने करीत घटनेचा तीव्र निषेध केला.

निवेदनात, धुळे जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत वैद्यकीय व्यावसायिकांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढले असून अशा घटनांमुळे डॉक्टरांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत आहे. संबंधित आरोपींवर कठोर गुन्हे दाखल करून डॉक्टर व त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण द्यावे, तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी आयएमएचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राखी चानखेडकर, आयएमएच्या धुळे शाखेचे अध्यक्ष डॉ.मनिष जाखेटे, सचिव डॉ.योगेश ठाकरे यांच्यासह आयएमएचे सदस्य उपस्थित होते.

## पान १ वरुन

**अनोंदणीकृत विमान......**

चालक प्रशिक्षण केंद्रे आहेत, याची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही चौकशी डीजीसीए करत आहे. या अनोंदणीकृत प्रशिक्षण केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य ते उपाय योजले जातील असेही त्यांनी सांगितले. दुर्घटनाग्रस्त विमानातील ब्लॅक बॉक्स तपास यंत्रणेच्या हाती आहे. त्यातील माहिती संकलित केली जात असून पूर्ण माहिती हाती आल्यानंतरच तपास यंत्रणेकडून याबाबतचा अहवाल प्राप्त होणार आहे. यामुळे सद्यस्थितीत दुर्घटनेबाबत भाष्य करणे अयोग्य आहे. बारामतीची विमान दुर्घटना दुर्दैवी असून यात महाराष्ट्राने चांगला नेता गमावला असून याचे दु:ख सर्वानाच आहे, असेही मंत्री मोहोळ म्हणाले. सांगलीजवळील कवलापूरला विमानतळ उभारणीसाठी प्रयत्न केले जातील. सध्या विमानतळाची जागा राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे असून राज्य शासन ही जागा विमानतळ उभारणीसाठी देणार आहे.

**भारतातील पहिल्या आपत्कालीन......**

या काँक्रिट धावपट्टीवर कोणताही मध्यवर्ती दुभाजक नाही. त्यामुळे विमानांची हालचाल सुरळीत होऊ शकते. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना कुंपण बसविण्यात आले आहे. आसाममधील दिब्रुगड विमानतळ किंवा चाबुआ हवाई दल स्थानकावरून काम करणे अशक्य झाल्यास किंवा काही आपत्कालीन परिस्थितीमुळे ते अनुपलब्ध झाल्यास पर्यायी लँडिंग पर्याय म्हणून या महामार्गाची उभारणी करण्यात आली आहे

**भरधाव डंपरच्या धडकेत......**

चालकाने वाहन न थांबवता पळ काढला. संतप्त नागरिकांनी तत्काळ इतरांना सतर्क करत पाठलाग सुरू केला. काही अंतरावर स्थानिकांनी डंपर अडवण्यात यश मिळवले; परंतु, चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. अपघातानंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला. वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे संतप्त नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमले. हजार ते दोन हजार नागरिकांनी डंपरवर दगडफेक करत काचा फोडल्या. प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध करत घोषणाबाजी केली. काही काळ परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. विशेष म्हणजे, याच चौकात साधारण वर्षभरापूर्वीही डंपरने एका बालकाला चिरडल्याची घटना घडली होती. त्या वेळीही नागरिकांनी अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्याची मागणी केली होती; मात्र, ठोस उपाययोजना न झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्यासह एमआयडीसी, शनिपेठ व रामानंदनगर पोलिस ठाण्यांचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. दंगा नियंत्रण पथकासह मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पोलिसांनी डंपर जप्त केला असून, चालकाचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत. सीसीटीव्ही फुटेजची तपासणीही सुरू आहे.

**धुळे जिल्हा परिषदेचे......**

१२ ते १४ एप्रिल दरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांनी विशेष उपस्थिती लावली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, प्रकल्प संचालक राजन पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत साबळे, शिक्षणाधिकारी मनीष पवार तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी स्वरांजली पिंगळे उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख आणि कर्मचारी आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले होते. सांस्कृतिक कार्यक्रमात जिल्हा परिषद मुख्यालय तसेच धुळे व शिरपूर पंचायत समिती कार्यालयांतर्फे एकांकिका, समूह नृत्य, एकल नृत्य आणि नाटिका अशा विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.

**रेरा कायदा रद्द......**

शकतो, असेही म्हटले आहे. अनेक महत्त्वांच्या पदांवर निवृत्त सनदी आधिकारी आणि निवृत्त न्यायाधीश नेमण्याची तरतुद केवळ रेरा कायद्यातच नाही तर अनेक कायद्यात आहे. त्यामुळे निवृत्त सनदी अधिकारी आणि न्यायाधीशांचे पुनर्वसन करणारे सर्वच कायदे रद्द करायचे का, असा सवाल ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष अ‍ॅड. शिरीष देशपांडे यांनी विचारला आहे. विकासक, सनदी अधिकारी आणि राजकीय नेते यांची अभद्र युती हे खरे मुळ दुखणे आहे. विकासकांची रेरा प्राधिकरणांत अनेकदा पाठराखण केली जाते ही खरी समस्या आहे. पण त्याचे उत्तर संपूर्ण रेरा कायदा रद्द करण्यात नसून विकासकांचे वर्चस्व दूर कसे करता येईल, याबाबत ठोस कृती होणे आवश्यक आहे, असे म्हटले आहे.

# क्रिकेट स्पर्धेसाठी आज निवड चाचणी

**प्रतिनिधी । शहादा**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्यावतीने घेण्यात येणाऱ्या १६ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेसाठी नंदुरबार जिल्हा मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता ड्रीम सिटी क्रिकेट अकॅडमीच्या मलोनी ता. शहादा मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. ज्या क्रिकेट खेळाडूंची जन्म तारीख १ सप्टेंबर २०१० व ३१ ऑगस्ट २०१२ च्या आत असेल तेच खेळाडू या निवड चाचणीसाठी पात्र असतील. सर्व इच्छुक खेळाडूंनी या निवड चाचणीत जास्तीत जास्त संख्येने आपला सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी सचिव युवराज पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नंदुरबार जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मकरंद पाटील यांनी केले आहे.

# बेबडदा फाटा ते मोडलगाव रस्त्याच्या दुरुस्तीचे आदेश

**प्रतिनिधी । कोलवीमाळे**

## ● युवा क्रांतीच्या निवेदनानंतर प्रशासनाचा निर्णय

धडगाव तालुक्यातील बेबडदा फाटा ते मोडलगाव रस्ता मृत्यूचा सापळा बनला असून, या गंभीर प्रश्नावर युवा क्रांती सामाजिक संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेचे अक्राणी–धडगाव तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी यांनी दिलेल्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर अवघ्या २४ तासांत प्रशासनाने लेखी पत्र देत तातडीने रस्ता दुरुस्तीचे आदेश दिले आहेत.

बेबडदा फाटा ते मोडलगाव हा मार्ग तेलखेडी, जुगनी, मोडलगाव, गोरंबा, लेगापानी तसेच तोरणमाळ यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्यावर १ ते २ फुटांचे खोल खड्डे पडून रस्ता पूर्णपणे उखडला गेला आहे. त्यामुळे हा मार्ग अत्यंत धोकादायक व अपघातप्रवण ठरला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे आपत्कालीन परिस्थितीत १०८ रुग्णवाहिका वेळेवर पोहोचू शकत नसल्याने रुग्ण, विशेषतः गरोदर माता आणि वृद्धांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. शाळा, अंगणवाड्या व इतर शासकीय सेवांवरही मोठा परिणाम होत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले होते.

दरम्यान, ७ ते १० दिवसांत काम सुरू न झाल्यास धडगाव–शहादा मुख्य रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा युवा क्रांतीने दिला होता. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लेखी खुलासा सादर करत रस्त्याच्या मजबुतीकरणाचे अंदाजपत्रक मंजूर असल्याचे स्पष्ट केले. निधीअभावी काम थांबले असल्याचे मान्य करत कंत्राटदारांना तातडीने खड्डे दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे पत्रात नमूद आहे.

दरम्यान, युवा क्रांतीचे तालुका प्रमुख लक्ष्मण पाडवी यांनी आंदोलन तूर्तास स्थगित ठेवण्यात आले असले तरी संघटनेची नजर प्रशासनाच्या कामगिरीवर कायम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# गावीत विद्यालयात विद्यार्थ्यांना दिले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**तालुक्यातील देवपूर येथील के. डी. गावीत माध्यमिक विद्यालयात जिल्हा आपत्ती प्राधिकरणतर्फे शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षणचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण सत्रात विद्यार्थ्यांना पूर्वतयारी व सज्जता, प्रतिसाद, सुटका, बचाव पद्धती, स्थलांतरण पद्धती, जीव रक्षक पद्धतीसह विविध विषयांवर धडे देण्यात आले.**



आपदामित्र प्रशिक्षक प्रकाश पावरा, जुनेद खाटीक, अमन खाटीक, लक्ष्मी दुर्वे यांनी विद्यार्थ्यांना शालेय आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले. यामध्ये नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती, आपत्ती व्यवस्थापन, नियोजन, पूर्वतयारी व सज्जता, प्रतिसाद, सुटका, बचाव पद्धती, स्थलांतरण पद्धती, जीव रक्षक पद्धती, आरोग्याशी निगडित प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापनात लिंग विषयक मुद्दे तसेच स्वतःच्या बचाव कसा करावा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंदा वसावे, मनोजकुमार सुर्यवंशी, संजय महाजन, विनोद पाटील, प्रफुल्ल निकम, उदय पाटील, माधुरी साठे, अतुल गावीत, पुरुषोत्तम मराठे, कन्हैयालाल पाटील, राकेश पाटील, कन्हैयालाल धनगर आदींनी परिश्रम घेतले.

# कामगार चळवळ मोडीत काढणारे कायदे मागे घ्या!

## जि.प.समोर कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । नंदुरबार**

कामगार चळवळ मोडीत काढणारे कायदे मागे घ्या, यासह विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्यावतीने जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. कामगार चळवळ मोडीत काढणारे चार श्रम संहिता, पीएफआरडी कायदा रद्द करणे तसेच संविधानिक हक्काच्या मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपात नंदुरबार जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने सहभाग घेतला. या संपाला पाठिंबा म्हणून जिल्हा परिषद कर्मचारी महासंघातर्फे हे लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष गणेश मोरे, जिल्हा सरचिटणीस धर्मराज चौधरी, कार्याध्यक्ष ज्योती संदानशिव, दिनेश कढरे, कोषाध्यक्ष डॉ.सुरेश राठोड, उपाध्यक्ष रत्नाकर शेंडे, चैताली आव्हाड, रामचंद्र साळी, सहसचिव चेतन सोनजे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**जळगाव ।** शहरातील एका भागात राहणाऱ्या एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शनीपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका भागात १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे. दि. १० फेब्रुवारी रोजी अज्ञात व्यक्तीने तिला काहीतरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेले. तपास पोलीस कर्मचारी हे करीत आहे.

### तरसोदच्या कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**जळगाव ।** तालुक्यातील तरसोद येथील एका ५५ वर्षीय शेतकऱ्याने शेतातच विषारी औषध घेऊन आपली जीवनयात्रा संपविली. अशोक रुपसिंग राजपूत असे या दुर्दैवी शेतकऱ्याचे नाव असून, दि. १४ फेब्रुवारी ही घटना घडली. याबाबत माहिती अशी की, अशोक रुपसिंग राजपूत (वय ५५, रा. तरसोद, ता. जळगाव) हे शनिवारी पहाटेच्या सुमारास आपल्या शेतात गेले होते. तिथेच त्यांनी नैराश्यातून विषारी औषध प्राशन केले. त्यांना तातडीने जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, विषारी औषधाचा परिणाम संपूर्ण शरीरात पसरल्याने त्यांची प्रकृती कमालीची खालावली होती. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### जिल्हा अल्पसंख्यांक डिपार्टमेंट बरखास्त

**जळगाव ।** जिल्हातील व महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक विभागाचे सर्व स्तरावरील प्रदेश, जिल्हा, तालुका, विधानसभाक्षेत्र, शहर व गाव पातळीवरील अल्पसंख्यांक डिपार्टमेंट बरखास्त करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार यांनी दिली. अल्पसंख्यांक विभागाचे महाराष्ट्राचे इन्चार्ज व व्हा. चेअरमन मोहम्मद अहमद खान यांनी दि.१३ फेब्रुवारी रोजी पत्रक काढून महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अल्पसंख्या विभाग व त्यासोबत सर्व जिल्हा तालुका शहर सर्व समित्या बरखास्त करण्याचे कळविले आहे.

# रामेश्वर कॉलनीत १८ दुचाकी जळून खाक

## ● माथेफिरुचा अजब प्रताप ; सीसीटीव्ही फुटेजवरुन आरोपी कैद होणार

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील मेहरूण परिसरामधील रामेश्वर कॉलनी येथे साई गजानन रेसिडेन्सी येथील अपार्टमेंटमध्ये लावलेली १८ दुचाकी वाहने शुक्रवारी रात्री २ वाजेच्या सुमारास जळून खाक झाली. ही घटना शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला घटनेची नोंद करण्यात आली.**



मेहरूण परिसरामध्ये रामेश्वर कॉलनी येथे साई गजानन रेसिडेन्सी ही मोठी सदनिका आहे. या अपार्टमेंटमध्ये अनेक रहिवासी आहेत. त्यांनी त्यांच्या दुचाकी अपार्टमेंटच्या खाली नेहमीप्रमाणे उभ्या केलेल्या होत्या. दरम्यान, शुक्रवारी मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास अचानक दुचाकींना आग लागली. प्रथम मजल्यावर राहणाऱ्या एका व्यक्तीला लघुशंका लागल्यानंतर तो जेव्हा बाहेर गॅलरीत आला तेव्हा त्याला आग दिसली. त्याने आरडाओरडा करून अपार्टमेंटमधील इतर रहिवाशांना बोलावले. तसेच पाण्याची मोटार लावून पाणी टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही दुचाकींच्या पेट्रोलच्या टाक्यांचा स्फोट झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे पाणी मारण्यास अडचणी आल्या.

जळगाव शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या बंबांनी येऊन आग आटोक्यात आणली. ही घटना एखाद्या माथेफिरूने केली असल्याचा नागरिकांना संशय आहे. याबाबतचे सीसीटीव्ही फुटेज तपासणी करण्याचे काम पोलीस व नागरिकांकडून सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. तर आग विझवण्याकामी अग्निशमन दलाचे वाहनचालक देविदास सुरवाडे, फायरमन रोहिदास चौधरी, यश मनोरे, चेतन सपकाळे, योगेश पाटील, ऋषभ सुरवाडे, भावेश मराठे आदींनी परिश्रम घेतले.

या घटनेमध्ये आत्माराम जाधव, शिरीष सोनवणे, अजय कापुरे, सुरेश सोनवणे, शरद बोरसे, ललित वेडीस, ज्योती पवार, राजेश खिडके, भारत तामनेरकर, किरण पाटील, सुधीर पाटील, मनोज मोरे, धोंडू बडगुजर यांच्या दुचाकींसह सागर पाटील व संग्राम विसपुते यांच्या प्रत्येकी २ दुचाकी जळून खाक झाले आहेत. रात्री घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

### पोलिस तपास चक्र सुरु

साई गजानन रेसिडेन्सी या सदनिकामध्ये मध्यरात्री झालेल्या घटनेप्रकरणी एका माथेफिरुचा प्रताप असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच या अपार्टमेंटमधील व परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी पोलिसांकडून करण्यात येत आहे. संशयित आरोपीला जेरबंद करण्यासाठी पोलिस तपास सुरु आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अपमानजनक टिप्पणी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कडक कारवाई करा!

### ● नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



प्रतिनिधी । जळगाव

**महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अपमानजनक टिप्पणी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कडक कारवाई करुन त्याची नार्को टेस्ट करण्यात यावी, अशी मागणी नॅशनल व्हॉईस मीडिया फोरमकडून करण्यात आली आहे.**

या मागणीचे निवेदन नुकतेच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना देण्यात आले. निवेदनात, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अनेक वेळा सोशल मीडियावर अपमान करणाऱ्याविरुद्ध प्रचंड संताप निर्माण झाला आहे. भूषण भास्कर पाटील (रा.डोंबिवली, जि.ठाणे) याने लाईव्ह फेसबुकसह पाच वेगवेगळ्या सोशल मीडियाच्या माध्यमातून बाबासाहेबांविषयी जल्लोषी भाषा वापरून अपमान केला असून यापूर्वी सुद्धा त्याच्यावर अशा वागणुकीमुळे नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचा या विकृतीचा समाजात निषेध व्यक्त केला जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या गंभीर प्रकरणाचा नॅशनल व्हॉइस मीडिया फोरमच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. आरोपीची नार्को टेस्ट करण्यात यावी. तसेच या घटनेमागील मुळ सूत्रधाराला शोधून कडक कारवाई करावी, अशी मागणीही राष्ट्रीय महासचिव प्रकाश सरदार, जिल्हाध्यक्ष दिनेश इखारे, रमेश खंडारे, सुमित सोनवणे, प्राजक्ता तायडे, विनोद सोनवणे, देवदत्त मकासरे आदींनी केली आहे.

## बालविश्व स्कूलमध्ये मातृ-पितृ पूजन सोहळा उत्साहात



प्रतिनिधी । जळगाव

**येथील बालविश्व इंग्लिश आणि सेमी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शनिवारी मातृ-पितृ पूजन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आपल्या पाल्यांनी केलेले पूजन पाहून अनेक पालकांचे डोळे आनंदाश्रूंनी पाणावले होते.**

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी

### पालकांच्या डोळ्यांत तरळले अश्रू

संस्थेचे संचालक सौरभ चौधरी, मुख्याध्यापिका भारती चौधरी, उपमुख्याध्यापिका मृणालिनी कुरंभट्टी, समन्वयक पल्लवी घारे व श्वेता चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पालकांचे औक्षण करून, पुष्पहार अर्पण केले आणि त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. तसेच विविध कलागुणांतून पालकांप्रती आपले प्रेम व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मातृ-पितृ भक्तीपर गीते आणि लघुनाटिका सादर केल्या. त्यानंतर आपल्या आई-वडिलांच्या त्यागा विषयी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका भारती चौधरी म्हणाल्या की, आई-वडील हेच आपले पहिले गुरु आहेत, त्यांचा सन्मान करणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन गौरी पाटील यांनी केले तर आभार आशा ठोंबरे यांनी मानले.

## सेवालयाचा ११ वा वर्धापन दिन आज होणार साजरा

### सेवा भारती देवगिरीतर्फे जळगावात आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

सेवा भारती देवगिरी प्रांताच्या माध्यमातून समाजातील वंचित व गरजू घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सेवा उपक्रमांपैकी सेवालय या प्रकल्पाचा ११ वा वर्धापनदिन रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी (महाशिवरात्री) सायं. ५ वाजता साजरा करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन गंधे हॉल, ला. ना. सार्वजनिक विद्यालय, जळगाव येथे करण्यात आले आहे.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून श्री स्वामी सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा उद्योजक रविंद्र माळी हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून सेवा भारती देवगिरी प्रांताचे सहसचिव प्रसन्नकुमार बोठे मार्गदर्शन करणार आहेत.

सेवालयच्या माध्यमातून गेल्या अकरा वर्षांत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असून अनेक गरजूंना मदतीचा हात देण्यात आला आहे. या सेवाकार्यात स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहून सेवाकार्याला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष मनीष काबरा व जिल्हा सचिव संदीप कासार यांनी केले आहे.

## मोडी लिपीचा समृद्ध वारसा संवर्धन करण्याचे काम इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी करावे!

### ● उपप्राचार्य देवेंद्र इंगळे यांचे प्रतिपादन; मोडी लिपी परिचय कार्यशाळेचा समारोप

प्रतिनिधी । जळगाव




**इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याचे काम मानवी बुद्धिमत्ताच करू शकते, एआय नाही. मोडी लिपीचा समृद्ध वारसा संवर्धन करण्याचे काम इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन मानव्यविद्या शाखेचे उपप्राचार्य प्रा.देवेंद्र इंगळे यांनी केले.**

मू.जे.महाविद्यालयाचा इतिहास विभाग व वारसा संवर्धन क्लब आणि डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालयाचा इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने सहा दिवसीय मोडी लिपी परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा समारोप शनिवारी झाला.

या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.केतन नारखेडे, डॉ.जे.व्ही. दुबे, डॉ.डी.एस.सोनटक्के आदी उपस्थित होते. महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरणारी मोडी लिपी विद्यार्थ्यांना अवगत व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळा संयोजक प्रा.डॉ. उज्वला भिरुड यांनी कार्यशाळेदरम्यान मराठा साम्राज्याच्या काळात राज्यव्यवहार व लोकव्यवहारात मोडी लिपीचा झालेला वापर आणि तत्कालीन कागदपत्रांचे महत्त्व याविषयी माहिती दिली. तसेच मोडी लिपीचा इतिहास, अक्षररचना, लेखनपद्धती तसेच प्रात्यक्षिक सराव याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्या मागील २३ वर्षांपासून अविरतपणे मोडी लिपीचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम करीत आहे. डॉ.केतन नारखेडे यांनी लोप पावत असलेल्या मोडी लिपीचे पुनरुज्जीवन करण्याचे काम या कार्यशाळेमार्फत करण्यात आल्याचे सांगितले. प्रास्ताविक बेंडाळे महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ.दिपक किनगे यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा.योगेश अत्तरकर यांनी केले. कार्यशाळेत सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

## डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात ७८ वर्षीय महिलेवर गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

प्रतिनिधी । जळगाव

**डॉ.उल्हास पाटील रुग्णालयात अकोला जिल्ह्यातील ७८ वर्षीय महिलेवर संपूर्ण गुडघा प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून तीव्र गुडघेदुखी व चालण्यास होणारा त्रास सहन करत असलेल्या या वृद्ध महिलेसाठी ही शस्त्रक्रिया मोठा दिलासा ठरली आहे.**



अकोला जिल्ह्यातील शिरसोली येथील ७८ वर्षीय मनुबाई गिऱ्हे या महिलेला दीर्घकाळापासून गुडघ्यांमध्ये असह्य वेदना होत होत्या. सुरुवातीला घरगुती उपचार, वेदनाशामक औषधे तसेच स्थानिक पातळीवर विविध उपचार करून पाहण्यात आले. मात्र वाढते वय, झिजलेले गुडघे आणि वेदनांची तीव्रता यामुळे चालणेही अत्यंत कठीण झाले होते. संधीवाताच्या त्रासामुळे हाडे ठिसूळ झाली होती. त्यामुळे दैनंदिन कामकाज, घरातील हालचाली आणि सामाजिक जीवन पूर्णतः विस्कळीत झाले होते. योग्य उपचाराच्या शोधात संबंधित महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी नागपूर तसेच संभाजीनगर येथील नामांकित रुग्णालयांमध्येही धाव घेतली.

मात्र वय जास्त असल्याने शस्त्रक्रियेबाबत जोखीम असल्याचे सांगत काही ठिकाणी शस्त्रक्रिया टाळण्याचा सल्ला देण्यात आला. त्यामुळे उपचाराचा प्रश्न कायम प्रलंबित राहिला.

### डॉ.उल्हास पाटील रूग्णालय आशेचा किरण

अखेर जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील रुग्णालयात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.दीपक अग्रवाल यांच्याकडून महिला रुग्णाची सखोल तपासणी करण्यात आली. आधुनिक तपासण्या, एक्स-रे आणि वैद्यकीय चाचण्यांनंतर रुग्णाच्या गुडघ्यांमध्ये तीव्र ऑस्टिओआर्थरायटिस असल्याचे निदान झाले. औषधोपचार निष्फळ ठरत असल्याने संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण हाच एकमेव प्रभावी पर्याय असल्याचा निर्णय वैद्यकीय पथकाने घेतला. रुग्णाचे वय लक्षात घेता ही शस्त्रक्रिया आव्हानात्मक होती. मात्र अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.दीपक अग्रवाल यांनी आपल्या दीर्घ अनुभव, कौशल्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. शस्त्रक्रियेसाठी डॉ.वेदांत पाटील, डॉ.सुमित भोसले यांच्यासह स्टाफने सहकार्य केले.

# भटक्या कुत्र्यांसाठी शहरात ४ ठिकाणी फीडिंग झोन

## मनपाकडून श्वानप्रेमींसाठी मार्गदर्शक सूचना, तक्रारीसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील भटक्या कुत्र्यांमुळे होणारा उपद्रव कमी करण्यासाठी महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाच्यावतीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. प्राणी जन्म नियंत्रण नियम, २०२३ आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, महापालिकेने शहरात प्रभागनिहाय 'श्वान फीडिंग झोन' (खाद्य केंद्र) प्रस्तावित केले असून श्वानप्रेमींसाठी कडक मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.**



महापालिकेने विविध प्रभागांत श्वानांना अन्न देण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. यात प्रभाग समिती १ मधील संरक्षण गो सेवा संस्था (शिवाजीनगर) आणि रेल्वे लाईन लगत (शिवाजीनगर पुलाखाली), प्रभाग समिती २ मधील सागरनगर पाण्याची टाकी आणि नॅशनल हायवे नं. ६ वरील क्वार्टरच्या मागे, प्रभाग समिती ३ मधील मेहरूण तलाव (श्रीकृष्ण लॉन्स लगत) आणि शिवाजी उद्यान (टीबीएस सेंटर) आणि प्रभाग समिती ४ मधील खंडेरावनगर पाण्याची टाकी आणि समतानगर (पठाण बाबा दर्ग्याजवळ) या

> रस्त्यावरील श्वानांना अन्न देणे हा दंडनीय गुन्हा असल्याचे भारतीय प्राणी कल्याण मंडळाने नमूद केले आहे. त्यामुळे शिस्त लावण्यासाठी हे फीडिंग झोन तयार करण्यात येत आहेत.
>
> – ज्ञानेश्वर ढेरे,
> आयुक्त, जळगाव महानगरपालिका.

### ➢ अशी नोंदवता येईल तक्रार, हरकत...

या प्रस्तावित जागांबाबत नागरिकांच्या काही हरकती किंवा सूचना असल्यास त्या १७ मजली प्रशासकीय इमारतीमधील ८ व्या मजल्यावर (आरोग्य विभाग) लेखी स्वरूपात कळवावे, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. भटक्या श्वानांच्या तक्रारीसाठी ८८५५७३५७४४ हा हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे.

### ➢ श्वानप्रेमी, नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना

रस्त्यावरील श्वानांना अन्न देणाऱ्या श्वानप्रेमी आणि नागरिकांसाठी मनपाकडून काही सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक रस्ते, पादचारी मार्ग, घरांच्या अगदी जवळ किंवा लहान मुलांच्या खेळण्याच्या ठिकाणी श्वानांना अन्न देऊ नये, अन्न दिल्यानंतर त्या ठिकाणी कचरा किंवा अस्वच्छता होणार नाही याची खात्री करावी, वाहतूक आणि मानवी हालचाल कमी असताना, म्हणजेच उशिरा रात्री किंवा पहाटे श्वानांना अन्न देणे, श्वानांना कच्चे मांस देऊ नये तसेच दोन वेगवेगळ्या श्वानांच्या टोळ्यांना एकाच वेळी अन्न देणे टाळावे, आदी सूचना मनपाकडून जाहीर करण्यात आल्या असून नागरिकांनी नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचेही मनपाने स्पष्ट केले आहे.

शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
epaper.shauryamarathi.com



# आगामी निवडणुकांसाठी सज्ज व्हा : आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे

## चोपड्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद दाखवणारी बैठक; नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील बोथरा मंगल कार्यालय येथे शिवसेनेची चोपडा विधानसभा मतदारसंघाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आमदार प्रा.चंद्रकांत सोनवणे व माजी आमदार सौ.लताताई सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.**



चोपडा नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा नम्रता पाटील, उपनगराध्यक्ष पंकज बोरोले तसेच नगरसेवकांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन गौरव करण्यात आला. यासोबतच जळगाव महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ.अमृताताई सोनवणे व नगरसेवक डॉ. गौरवदादा सोनवणे यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात सत्काराला प्रतिसाद दिला. बैठकीत आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या अनुषंगाने सखोल चर्चा करण्यात आली. संघटन अधिक सक्षम करण्यासाठी बूथपातळीवर कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, प्रत्येक गावात बैठका व जनसंपर्क मोहीम राबवावी, असे निर्देश आमदार सोनवणे यांनी दिले. पक्षाच्या बळावरच विकासाची गती कायम राहील. त्यामुळे आतापासूनच निवडणूक तयारीला लागा, असे आवाहन त्यांनी केले. माजी आमदार लताताई सोनवणे यांनीही कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचा संदेश दिला. मतदारसंघातील सर्व पदाधिकारी, बूथप्रमुख, शिवदूत, प्रसिद्धी प्रमुख व सोशल मीडिया प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**● इच्छुकांची उपस्थिती**

**जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात चोपडा मतदारसंघातील सर्व पदाधिकारी, बूथप्रमुख, शिवदूत, प्रसिद्धी प्रमुख व सोशल मीडिया प्रमुखांची बैठक घेतल्याने उपस्थितीचा मोठ्या संख्येने परिणाम दिसून होते. त्यामुळे इच्छुकांसह नवोदित जि. प. पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.**

## जिल्हा पोलीस भरतीत ५९३ उमेदवार मैदानी चाचणीत पात्र

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हा पोलीस दल यांच्या आस्थापनेवरील १७१ रिक्त पोलीस शिपाई पदांसाठी सुरू असलेली भरती प्रक्रिया पारदर्शक आणि गुणवत्ता आधारित पद्धतीने राबविण्यात येत आहे. दि. १४ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीचा दैनंदिन अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. आजच्या दिवशी एकूण १५०० उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी पाचारण करण्यात आले होते. त्यापैकी ११०७ उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित राहिले, तर ३९३ उमेदवार अनुपस्थित होते. उपस्थित उमेदवारांपैकी १०२ जण शारीरिक मोजमापात अपात्र ठरले. तसेच मैदानी चाचणीदरम्यान ४१२ उमेदवार अपात्र झाले. दरम्यान, ५९३ उमेदवारांनी मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करत पुढील प्रक्रियेसाठी पात्रता मिळविली आहे. भरती प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पाडला जात असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# राज्य उत्पादन शुल्काचा मोठा दणका

## १३ लाखांचा मुद्देमाल जप्त; चाळीसगावात दोन संशयित आरोपींना अटक

प्रतिनिधी । चाळीसगाव

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने चाळीसगाव-मालेगाव रस्त्यावरील देवळी शिवार परिसरात मोठी कारवाई केली. अवैध मद्यसाठ्यासह तब्बल १२ लाख ९१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी धुळे जिल्ह्यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून महागडी कार आणि प्रतिबंधित मद्यसाठा हस्तगत करण्यात आला आहे.**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि नाशिक विभागाच्या उपआयुक्त उषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली.

निरीक्षक के.एन.गायकवाड यांना चाळीसगाव ते मालेगाव रस्त्याने अवैध मद्याची वाहतूक होणार असल्याची गुप्त बातमी मिळाली होती. त्यानुसार १२ फेब्रुवारी रोजी देवळी शिवारात सापळा रचून एमएच-१८ सीएल ८३०३ क्रमांकाची मारुती सुझुकी अर्टिगा कार थांबवून तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान वाहनात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला आणि दमण येथे विक्रीसाठी असलेला विदेशी मद्यसाठा आढळून आला. एकूण अंदाजे किंमत १२ लाख ९१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत सचिन भिकन पाचपुते (वय २७) आणि मिथुन महादू मोरे (वय ४०, दोघेही राहणार विंचूर, ता. जि. धुळे) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गासाठी चोपडा तालुक्यात शेतजमिनीच्या मोजमापास सुरुवात

प्रतिनिधी । चोपडा

**येथून जाणारा बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गासाठी अधिग्रहित करण्यात येणाऱ्या शेतजमिनीच्या मोजमापास दि.१३ फेब्रुवारीपासून नारोद (चोपडा) शिवारातून औपचारिक सुरुवात करण्यात आली.**



भूमी अभिलेख कार्यालयाच्या पथकाने कृषी व महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष शेतात जाऊन मोजणीची प्रक्रिया हाती घेतली आहे. हे काम अतिशय वेगाने सुरू आहे. नारोद गटातील यादव पौलाद पाटील, नवल पौलाद पाटील, राहुल नवल पाटील, महेश चिरंजीलाल शर्मा, चंदू पाटील, पांडुरंग सीताराम पाटील व पंकज पाटील यांच्या शेतजमिनींची मोजणी करण्यात आली. तसेच खरद शिवारातील गट क्रमांक ४१ व ४२ मधील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोजमाप पूर्ण करण्यात आले. ही कामगिरी भूमी अभिलेख कार्यालयाचे भूकर मापक गणेश शिंदे, अडावदचे भूमापक पर्यवेक्षक संजय भीमराव मनोरे, कृषी सहायक प्रतिभा महाजन, आरएनटी श्री.पवार, नारोद ग्रामविकास अधिकारी पवन पवार तसेच कृषी विभागातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली. मोजमापावेळी बहुतांश शेतकरी उपस्थित होते.

## थोडक्यात

### ब्राह्मणशेवगे परिसरात विजेचा लपंडाव

**चाळीसगाव** । तालुक्यातील ब्राम्हणशेवगे परिसरात गेल्या महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरु आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यास अडचण निर्माण होत आहे. हाता तोंडाशी आलेला घास पिकांना पाणी न देता येत असल्याने वाया जातो की काय? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून दिवसभरात सतत वीजपुरवठा गुल होत आहे. त्यामुळे ऐन काढणीवर आलेल्या गहू, हरभरा, मका इ. पिंकांना विजेच्या लपंडावामुळे पाणी न देता आल्यामुळे उत्पादनात घट येणार आहे. काही पिके वायाही जाणयाची भीती निर्माण झाली आहे. तसेच अचानक वीजपुरवठा चालू बंद होत असल्याने विद्युत पंप व स्टार्टरही नादुरुस्त होऊन बळीराजाला नाहक आर्थिक फटका बसत आहे.

### काहूरखेडा जि.प. शाळेचा वर्धापन दिन साजरा

**भुसावळ** । तालुक्यातील काहुरखेडे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा ११४ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी दिगंबर पाटील, कृष्णा पाटील, सोपान पाटील, देविदास बोरसे, अरुण पाटील, ज्ञानेश्वर पाटील, चंदाबाई पाटील, गणपत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषणात शिक्षणाचे महत्त्व, शिस्त, संस्कार आणि उज्ज्वल भविष्यासाठी परिश्रम करण्याचे आवाहन केले. वर्धापनदिनानिमित्त शाळेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेत कार्यक्रम अधिक रंगतदार केला.

# बोरअजंटी शाळेत ‘बाल आनंद मेळावा’ उत्साहात

## ● विद्यार्थ्यांनी उभारले खाद्यपदार्थ व शैक्षणिक साहित्याचे स्टॉल

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बोरअजंटी येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ‘बाल आनंद मेळावा’ उत्साहात पार पडला. कृतीद्वारे शिक्षण या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ, भाजीपाला तसेच शैक्षणिक साहित्याचे आकर्षक स्टॉल उभारले.**



मेळाव्यात खरेदी-विक्रीच्या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांना गणितीय व्यवहार, पैशांचे नियोजन, नफा-तोट्याची समज आणि दैनंदिन व्यवसायाचे महत्त्व यांची प्रत्यक्ष अनुभवातून ओळख झाली. पालक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांकडून वस्तू खरेदी केल्या व त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे उद्घाटन नागलवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख देवेंद्र पाटील यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच शकुंतला बारेला, शा.व्य. स. उपाध्यक्षा छाया कोळी, आश्रमशाळेचे प्राचार्य बी. के. भालेराव यांसह मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक सुनील पाटील, शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या प्रयत्नातून उपक्रम यशस्वी झाला. उपस्थितांनी आयोजनाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

# फत्तेपूर येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

प्रतिनिधी । जामनेर

**तालुक्यातील फत्तेपूर येथील राजर्षी शाहू मल्टीस्टेट सोसायटीचे अध्यक्ष संदीप शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक सोसायटी शाखेत रक्तदान शिबिराचा उपक्रम राबवण्यात आला. येथील राजर्षी शाहू शाखेतसुद्धा रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.**

या शिबिरास चांगला प्रतिसाद तरुणांकडून मिळाला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्रा.वाय. सी. चौधरी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक पांडुरंग उगले, तंटा मुक्तीचे अध्यक्ष बबलु भंसाली, सरपंच पती पुना शेजुळे, माजी सरपंच राजेंद्र पाटील, डॉ.महेश जाधव, पतसंस्थेचे संचालक बाबुराव दांडगे, राजर्षी शाहू मल्टीस्टेटचे सरसंचालक दिलीप चव्हाण आदी उपस्थित होते. प्रथम प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विविध थोर पुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर रक्तदानाचे महत्त्व राजेंद्र पाटील, पांडुरंग उगले, पुना शेजुळे, वाय.सी. चौधरी यांनी मनोगतातून मांडले. कार्यक्रमाला सोसायटीचे चेअरमन गणेश चोपडे, विभागीय व्यवस्थापक निलेश व्यवहारे, अभयसिह राजपूत, राहुल चौधरी, दिनेश गोडंबे, राजीव तायडे, कैलास चौधरी, प्रदीप भंसाली यांच्यासह शाखेचे ग्राहक व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर रक्तदान शिबिरामध्ये गणेश चोपडे, गजानन देशमुख, सुनिल कोकरे यांनी रक्तदान करून कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर अनेकांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरात जळगाव येथील रेड प्लस ब्लड सेंटरच्या टीमने रक्तदान करणेबाबत सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व्यवस्थापक संदीप दुडे तरआभार शाखा व्यवस्थापक नितीन बढे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजर्षी शाहू शाखेचे व्यवस्थापक नितीन बढे, संदीप दुडे, विशाल गावंडे, गौरव इंगळे, रितेश खराटे आदीनी परिश्रम घेतले.

# धानोरा येथील सतपंथ ज्योत मंदिराचे काम पूर्णत्वाकडे

प्रतिनिधी । धानोरा ता.चोपडा

**येथील सतपंथज्योत मंदिराचे गृह गाभाऱ्याचे व मंदिर जीर्णोद्धाराचे काम पूर्णत्वाकडे येत असून परम पूज्य महामंडलेश्वर स्वामी जनार्दन हरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाचा वेग जलद गतीने होत आहे. येत्या एप्रिल महिन्यात मंदिराचे काम पूर्ण होऊन या ठिकाणी खानदेशात प्रथमच दशावतार मूर्तींचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार आहे.**



या मंदिर कार्यासाठी राजस्थानचे मूर्तिकार रमेश शर्मा, मूर्ति पेंटिंग्स कलाकार किशन शर्मा आणि टीम अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या कामाची प्रत्यक्ष पाहणी प्रेरणा पिठाधीश्वर अहमदाबाद येथील परम पुज्य जगद्गुरु ज्ञानेश्वर दासचार्य महाराज यांनी प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले आहे. येत्या एप्रिल महिन्यात श्री गोपी गीत, महाविष्णू याग, श्री दशावतार मूर्ती प्राणप्रतिष्ठा महोत्सव व वैदिक सनातन धर्म संमेलन संपन्न होणार आहे.

या भव्य दिव्य कार्यक्रमाला धानोरा येथे दीपोत्सव साजरा होणार असून देशभरातून ३०० संतांचे पदस्पर्श धानोरा भूमीला लाभणार आहेत. या दशावतार प्राणप्रतिष्ठा महोत्सवासाठी परमपूज्य महामंडलेश्वर स्वामी जनार्दन हरीजी महाराज या मंदिराच्या कार्याकडे जातीने लक्ष देत आहेत.

या मंदिराच्या जीर्णोद्धार कार्यासाठी धानोरा, भुसावळ, फैजपूर, जळगाव, जांभोरा, दापोरी, सतपंथज्योत मंदिराचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि सर्व संचालक व धानोरा सतपंथ अनुयायी परिश्रम घेत आहेत.

# वर्गणी नाकारल्याने तरुण उद्योजकांवर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी । भडगाव

बैलांच्या शर्यतीसाठी मागितलेली वर्गणी देण्यास नकार दिल्याच्या रागातून येथील एका तरुण उद्योजकावर ‘फायटर’ने जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली.या हल्ल्यात सौरभ विजयकुमार देशमुख (वय २८) हे गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी भडगाव पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी सौरभ देशमुख हे १० फेब्रुवारी रोजी रात्री ७:३० ते ८:३० वाजेच्या सुमारास आपल्या मोटारसायकलने जात होते. भडगाव येथील माजी नगराध्यक्ष अतुल पाटील यांच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर आरोपी हितेश शंकर मारवाडी याने त्यांना अडवले. या संशयित आरोपीने काही दिवसांपूर्वी सौरभ यांच्याकडे बैलांच्या शर्यतीसाठी वर्गणी मार्गितली होती

# चहार्डी जि.प शाळेत विद्यार्थ्यांना मोफत ट्रॅकसूट वाटप

## पद्मालया सीड्स प्रायव्हेट लिमिटेडतर्फे राबवण्यात आला सामाजिक बांधीलकीचा उपक्रम

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील चहार्डी येथील जि. प. मुलांच्या केंद्र शाळेत पद्मालया सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, चोपडा यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत ट्रॅकसूटचे वाटप करण्यात आले. एकूण ४० विद्यार्थ्यांना ट्रॅकसूट देऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मालया सीड्सचे संचालक राहुल पाटील, एस.टी.महामंडळ निवृत्त लिपिक सुभाष पाटील, लघुउद्योजक मनोहर पाटील , सेवानिवृत्त प्राचार्य व्ही.आर.सोनवणे (शा.शि. पाटील विद्यालय), सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवान चौधरी, सामाजिक कार्यकर्ते हिम्मत नाना पाटील तसेच प्राथमिक शिक्षक हर्षल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात चंद्रकांत पाटील यांनी शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पद्मालया सीड्सचे संचालक राहुल पाटील यांनी भविष्यातही शाळेच्या भौतिक सुविधा व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मीनाक्षी मोरे यांनी केले.

सूत्रसंचालन संभाजी पाटील यांनी तर आभार प्रदर्शन जीवन पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.